# सहसंचालक, तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय,

शासकीय तंत्र निकेतन परिसर, गाडगे नगर, अमरावती ४४४ ६०३

E-mail:-roamravati.dte@gmail.com Ph.No. :(०७२१) २५७३०२७, २५७२५७७

Website: www.jdroamt.org Fax No. : (0721) 257 7913


**महत्वाचे / ई-मेलव्दारे** क्रमांक :-विकाअ/शिक्षण/MIS/२०१६/ 3598

**कालमर्यादीत दि.२/१२/२०१६ पर्यंत.** दिनांक 30/11/2016

**प्रति,**

**प्राचार्य,**
सर्व शासकीय, अनुदानित व कायम विना-अनुदानित - पदवी व पदव्युत्तर पदवी संस्था,
अमरावती विभाग, अमरावती.

**विषय :- आपल्या विभागातील संस्थेत सुरु असलेल्या पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाचे (ॲक्रिडीटेशन) मुल्यांकन व दर्जा मानांकन बाबतची माहिती उपलब्ध करुन देण्याबाबत.**

**संदर्भ :-** १) शासन निर्णय, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग क्रमांक इबीसी-२०१६/प्रक्र२२१ / शिक्षण-१ दिनांक ३१/०३/२०१६.

२) मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा. मुंबई यांचे पत्र क्रमांक २अ/एडीएम/अक्रिडेशन/२०१६/१५५४ दिनांक २४/११/२०१६.

उपरोक्त विषयाबाबत आपणास कळविण्यात येते की, संदर्भीय शासन निर्णयान्वये सामाजिक न्याय व विशेष सहाय्यक विभागामार्फत राज्यातील शासन मान्य खाजगी विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित संस्थेतील प्रवेशीत विद्यार्थ्यांना शैक्षणिक शुल्काच्या प्रतिपुर्ती बाबत सदर शासन निर्णयातील तरतूदीनुसार शैक्षणिक वर्ष २०१८-१९ पर्यंत सक्षम शिखर परिषद संस्थेकडून मुल्यांकन व दर्जाचा मानांकन प्राप्त करणे आवश्यक असल्याबाबत तंत्रशिक्षण संचालनालयाचे संदर्भीय पत्रान्वये कळविलेले आहे. (प्रत सलग्न)

तसेच संदर्भीय पत्रान्वये शिखर परिषदेकडून मुल्यांकन व दर्जा मानांकनाबाबतची शैक्षणिक वर्ष २०१६-१७ पर्यंतची माहिती सोबत जोडलेल्या प्रपत्रात **दिनांक २/१२/२०१६ पर्यंत** या कार्यालयास सादर करावी. जेणे करुन सदर माहिती मा. तंत्रशिक्षण संचालनालयास सादर करणे शक्य होईल, याची नोंद घ्यावी.

**सहपत्र :- संदर्भीय पत्र क्र. २**

प्र.सहसंचालक तंत्रशिक्षण,
अमरावती.

**प्रत :-** प्रोग्रामर, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, अमरावती यांना संकेतस्थळावर टाकण्याकरीता.

# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक १९६७, मुंबई ४०० ००१.

दूरध्वनी - २२६२०६०१, २२६९०६०२, २२६४११५०/५१, फॅक्स - २२६९२१०२.

E-mail : desk2a@dte.org.in Internet :http/www.dtemaharashtra.gov.in


महत्वाचे

क्रमाक:२अ/एडीएम/अक्रिडेशन/२०१६/

दिनांक : 24 NOV 2016

प्रति,

सहसंचालक,

तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,

मुंबई/पुणे/नाशिक/औरंगाबाद/नागपूर/अमरावती

विषय:- आपल्या विभागातील संस्थेत सुरु असलेल्या पदवी व पदवित्तर पदवी अभ्यासक्रमांचे ( अक्रिडिटेशन ) मुल्यांकन व दर्जा मानांकन बाबतची माहिती उपलब्ध करुन देण्याबाबत.

संदर्भ : १) शासन निर्णय सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग क्रमांक इबीसी-२०१६/प्रक्र २२१/ शिक्षण -१, दि. ३१.०३.२०१६

२) या कार्यालयाचे पत्र क्र. २अ/एडीएम/२०१६/१२१०, दि. ०१.०९.२०१६

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने आपणांस कळविण्यात येते की, संदर्भ क्रमांक 1 च्या शासन निर्णयान्वये सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागा मार्फत् राज्यातील शासन मान्य खाजगी विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित संस्थामधील व्यावसायिक अभ्यासक्रमा मध्ये प्रवेश घेतलेल्या अनुसूचित जाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागास वर्ग व विशेष मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांना शैक्षणिक शुल्काच्या प्रतिपूर्ती योजनेच्या अनुषंगाने सविस्तर तरतुदी निर्गमित केलेल्या आहेत. शुल्क प्रति पूर्ती बाबत सदर शासन निर्णयातील तरतूदी नूसार सदर योजने अंतर्गत पात्र असणारे व्यावसायिक अभ्यासक्रम राबविणा-या संबंधित शैक्षणिक संस्थानी पुढील तीन वर्षाच्या आत महणजेच शैक्षणिक वर्ष 2018-19 पर्यत सक्षम शिखर परिषद संस्थे कडुन मुल्यांकन व दर्जाचा मानांकन प्राप्त करणे आवश्यक राहिल. तदनंतर शैक्षणिक वर्ष 2019-20 पासून संबंधित शिखर संस्था कडुन मुल्यांकन व दर्जा निश्चिती करून मुल्यांकन प्राप्त न केल्यास अशा संस्थाना मुल्यांकन व दर्जा मानांकन प्राप्त होई पर्यंत वगळण्यात येईल व त्या वर्षा पासून केवळ मानांकन प्राप्त करणा-या शैक्षणिक संस्था मध्ये प्रथम वर्षासाठी प्रवेश घेणा-या विद्यार्थ्यां करीताच सदर योजनेचा लाभ अनुज्ञेय राहिल असे स्पष्ट केलेले आहे.

वरीलबाब विचारात घेऊन आपणांस कळविण्यात येते की, आपल्या विभागातील शासन मान्य खाजगी विना अनुदानित व कायम विनाअनुदानित संस्थामध्ये व्यावसायिक पदवी अभ्यासक्रमांचे सक्षम शिखर परिषदे कडुन मुल्यांकन व दर्जा मानांकनाबाबतची शैक्षणिक वर्ष 2016-17 पर्यंतची माहिती सोबतच्या प्रपत्रात उपलब्ध करुन घ्यावी व सदर माहिती या संचालनालयास दिनांक 05.12.2016 पर्यंत न चुकता सादर करण्यात यावी.

(डॉ. सुभाष महाजन)

संचालक

तंत्रशिक्षण संचालनालय, मुंबई

प्रपत्र-अमुल्यांकन व दर्जा मानांकनाची संस्था निहाय माहिती (पदवि/पदवित्तर अभ्यासक्रम)

विभाग : -

| अ.क्र. | अभ्यासक्रम | एकूण संस्था | मुल्यांकन व दर्जा मानांकन झालेल्या एकूण संस्था | मुल्यांकन व दर्जा मानांकन न झालेल्या एकूण संस्था | मानांकनासाठी निकर्षात न बसण्याच्या संस्थाची संख्या | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | अभियांत्रिकी | | | | | |
| 2 | औषधनिर्माणशास्त्र बी फार्मसी | | | | | |
| 3 | फार्म. डी | | | | | |
| 4 | वास्तुशास्त्र | | | | | |
| 5 | एच एम सी टी | | | | | |
| | एकूण | | | | | |

प्रपत्र -ब

मुल्यांकन व दर्जा मानांकनाची संस्था व अभ्यासक्रम निहाय माहिती (पदवि/पदवित्तर अभ्यासक्रम)

विभाग : -

| संस्थेचे नाव | अभ्यासक्रमाचे नांव | मानांकन व दर्जा मुल्यांकन झाले असल्यास त्याचा कालावधी | मानांकन व दर्जा मुल्यांकन न झाले असल्यास त्याची कारणे | मानांकन व दर्जा मुल्यांकनाबाबत शिखर संस्थेकडे अर्ज केले आहे किंवा कसे | नसल्यास त्याची कारणे | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|